**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने प्रमाणित केलेल्या घटकाव्दारे तयार केलेल्या डिटर्जंट साबणाव्यतिरिक्त साबणावरील दि. १ एप्रिल २००५ ते दि. ३१ मार्च २०१० या कालावधीकरिता प्रति वार्षिक रुपये २० लक्ष पर्यंतच्या उलाढालीच्या करावर देय असलेले व्याज व दंड माफ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - मुवक-१५११/ प्रक्र.६७/ कराधान-१,**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२,**
**दिनांक :- १६ मे, २०११.**

**प्रस्तावनाः-**

राज्यात दिनांक १ मे २०१० पासून, मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० अन्वये घटित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने प्रमाणित केलेल्या घटकांव्दारे तयार केलेल्या डिटर्जंट साबणा व्यतिरिक्त, घरगुती कपडे धुण्याच्या साबणावरील मूल्यवर्धित कर माफ केला आहे. हस्तनिर्मित साबण उद्योग हा लहान असून ग्रामीण भागात प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणारा आहे. या उद्योगाच्या अडचणी लक्षात घेवून दिनांक १ एप्रिल २००५ ते दिनांक ३१ मार्च २०१० या कालावधीकरिता वार्षिक रुपये २० लक्ष पर्यंतच्या उलाढालीच्या करावर देय असलेले व्याज व दंड माफ करण्याचे मा. उपमुख्यमंत्री यांनी त्यांच्या सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय भाषणात प्रस्तावित केले होते. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.-

**शासन निर्णयः-**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने प्रमाणित केलेल्या साबण उद्योग घटकांनी दिनांक १ एप्रिल, २००५ ते ३१ मार्च २०१० या कालावधीसाठी उत्पादित केलेल्या डिटर्जंट साबणाव्यतिरिक्त साबणावरील प्रतिवर्षी रुपये २० लक्ष पर्यंतच्या विक्रीच्या करावर देय असलेले व्याज व तत्संबंधी शास्ती खालील अटींच्या अधीन राहून माफ करण्यात येत आहे.

सवलतीच्या अटी:-

१) व्यापारी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ खाली सवलतीच्या कालावधीकरिता नोंदणीकृत असावा.

D:\Bac to C\Tax-1 -2011\C.R. 2011 G.R.- C.R.67

२) व्यापा-याने दिनांक १ एप्रिल, २००५ ते ३१ मार्च, २०१० या कालावधीची सर्व विवरणपत्रे, पूर्ण देय करासह दि. ३०/९/२०११ पर्यंत भरलेली असावीत.

३) व्यापा-यांची निर्धारणा होऊन एकत्रित शास्ती आकारण्यात आली असेल तर रुपये २० लाख पर्यंतच्या उलाढालीच्या प्रमाणात ती माफ करण्यात येईल. जर उलाढाल रुपये २० लाखापेक्षा कमी असेल तर पूर्ण शास्ती माफीस पात्र असेल.

४) व्यापा-याने करासह विवरणपत्र भरुन दि. ३० सप्टेंबर, २०११ पर्यंत व्याज व दंड माफीसाठी आवश्यक प्रमाणासह अर्ज विहित अधिका-याकडे सादर करावा. ज्या प्रकरणांमध्ये निर्धारणा पूर्ण झाल्या नसतील, त्या व्यापा-यांच्या निर्धारणा दि. ३१ जुलै, २०११ पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात.

५) या योजनेखाली कोणत्याही व्यापा-यास भरलेल्या व्याज व दंडासंबंधी परतावा मिळणार नाही.

**<u>अधिकार व कार्यपध्दतीः-</u>**

या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीचे तसेच कार्यपध्दती विहीत करण्याचे सर्व अधिकार विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत आहेत. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य हे अधिकार त्यांच्या दुय्यम अधिका-यांना प्रदान करु शकतील.

या शासन निर्णयासंबंधी सर्व शंकांचे निरसन करण्याचे अंतिम अधिकार विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत आहेत व त्यांचा यासंबंधी निर्णय अंतिम असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०५१६१४३६५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भांगडीया
१६।५।११
( ओ. चै. भांगडीया )
उप सचिव,वित्त विभाग

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सहायक,
विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
सर्व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य